# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २९/०८/२०२४ (गुरूवार) सायंकाळ**

---

**पोलीस ठाणे रामटेक जि. नागपूर ग्रामिण कडुन मोटार सायकल चोरीचा गुन्हे उघडकिस आणुन मुद्देमाल हस्तगत**

पोलीस ठाणे रामटेक गुन्हा रजि. क्र. ५७०/२४ कलम ३०३(२), ३(५) भा.न्या.स. मधील फिर्यादी नामे सौरभ शंकर दिवटे वय २५ वर्ष रा. अडेगाव ता. मौदा हे दि. १५/०८/२०२४ रोजी सायंकाळी ०७.३० वा. सुमारास आपले परिवारासह रामटेक शहरात आनंद मेला पाहण्याकरीता त्यांची काळया रंगाची पांढरे पट्टे असलेली स्प्लेंडर प्रो मोटार सायकल क्रमांक MH 40 AP 4975 किंमती २०,०००/— रू. ही उभी करून ठेवली होती सदर मोटार सायकल अज्ञात चोरांनी चोरून नेली होती. सदर गुन्ह्यात गोपनिय बातमीदाराकडुन माहीती प्राप्त करून आरोपी नामे १) रोशन शंकर वाघाडे वय १९ वर्ष रा. खंडाळा ता. रामटेक २) निखील बाळकृष्ण चन्ने वय २१ वर्ष रा. काचुरवाही ता. रामटेक ३) प्रज्वल पचरू वैद्य वय १८ वर्ष रा. काचुरवाही ता. रामटेक यांना निष्पन्न करण्यात आले असुन सदर गुन्ह्यात तिनही आरोपीतांना दि. २६/०८/२०२४ रोजी अटक करून त्यांचे ताब्यातुन १) पांढरे पट्टे असलेली काळी स्प्लेंडर प्रो मोटरसायकल क्र. MH 40 AP 4975 किंमती रु. २०,०००/—रू. २) तसेच सदर गुन्हा करणेकरीता वापरलेली एक लाल रंगाची बजाज कंपनीची प्लॅटीना मोटार सायकल क्रमांक MH 40 T 1021 किंमती ३०,०००/— रू. एकुण किंमती ५०,०००/— रू. चा माल हस्तगत करण्यात आला आहे.

सदरची कारवाई मा. श्री. हर्ष पोद्दार पोलीस अधिक्षक, नागपूर ग्रामिण, मा. श्री. रमेश धुमाळ, अपर पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामिण, मा. श्री. रमेश बरकते, उपविभागिय पोलीस अधिकारी, रामटेक यांचे मार्गदर्शनात पोनि प्रशांत काळे, पोउपनि श्रीकांत लांजेवार, पोउपनि हरिचंद्र मोरे, पोहवा अमोल इंगोले, पोहवा गजानन माहुरे, पोना प्रफुल रंधई, पोना मंगेश सोनटक्के, पोशि शरद गिते, पोशि धिरज खंते, पोशि योगेश कुयटे, चापोशि विशाल चव्हाण यांनी केली.



## गुत्ता चालविणाऱ्या ढाब्यावर केळवद पोलीसाची कारवाई

आज दिनांक २९/०८/२०२४ रोजी राष्ट्रीय महामार्ग क्र. ४७ वरील मौजा उमरी शिवारातील गुप्ता ढाबा व खुर्सापार शिवारातील शिवराज ढाबा येथे अवैधरीत्या दारूचा गुत्ता चालतो व ते गाहकाना दारू उपलब्ध करून दारू पिण्याकरीता सर्व सुख सोई उपलब्ध करून देतात अशा खात्रीशीर बातमीदाराकडुन माहीती मिळाल्यावरून. सदरची माहीती माननीय वरीष्ठांना देवुन त्याचे मार्गदर्शनात वेगवेगळे दोन पथके तयार करून अवैध दारूचा गुत्ता चालविणाऱ्या दोन्ही ढाब्यावर छापा टाकला असता मौजा उमरी शिवारातील ढाब्यावर असलेला इसम नामे मोतीराम गोविंदराव कोल्हे हा मिळुन आला. त्याचे ताब्यातुन देशी विदेशी, मोठया प्रमाणात दारू, फ्रिज, दोन नग टी व्ही बसण्याची खाट, पाणी बॉक्स, प्लास्टीक ग्लॉस, चकन्याचे साहीत्य एकुण ३३९७०/— रू चा माल मिळुन आला. तसेच मौजा खुर्सापार शिवारातील शिवराज ढाब्यावर छापा टाकला असता दादु रेवतकर याचे नौकर कृष्णा काशिराम बारगे रा. खुर्सापार व अशोक बालाजी दुपारे रा. गुजरखेडी पांडुर्णा मध्यप्रदेश हे मिळुन आले शिवराज ढाब्या मध्ये देशी विदेशी बियर, मोठ्या प्रमाणात दारू, दोन फ्रिज, १५ खुर्च्या, दोन टेबल, एक बसण्याची खाट, २०० नग प्लॉस्टीक ग्लॉस व चकन्याचे साहीत्य ३३०४५/— रू असा एकूण ७७०१५/— रू चा मुददेमाल मिळुन आल्याने दोन्ही ढाबा चालक व त्याचे माणसावर पोलीस स्टेशन केळवद येथे अप क्र. ४४४/२०२४ कलम ६५ (ई) ६८, ८३ महाराष्ट्र दारूबंदी कायदा व अप. क्र. ४४५/२०२४ कलम ६५(ई) ६८, ८३ महाराष्ट्र दारूबंदी कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला असुन तपास सुरू आहे.

सदरची कारवाई मा. श्री. हर्ष पोद्दार पोलीस अधिक्षक, नागपूर ग्रामिण, मा. श्री. रमेश धुमाळ, अपर पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामिण, मा. सहायक पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर श्री. अनिल म्हस्के साहेब याचे मार्गदर्शनात सहायक पोलीस निरीक्षक श्री अनिल राउत, ठाणेदार केळवद, पी.एस. आय. विलास गेडाम, सफौ नरेश वरखडे, पोना प्रकाश ठोके, पोलीस अंमलदार सचिन सलामे, पियुष वाढवे, नितेश पुसाम यांनी सदरची कारवाई केली आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**